महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

सुचना क्र.- ९ दिनांक : १०/०९/२०२९

पोलीस आयुक्त, कार्यालय, ठाणे शहर.
पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५.

-: दि.२३/०९/२०२६ रोजी नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी सुचना :-

विषय :- ठाणे शहर पोलीस शिपाई भरती २०२४-२५

-----ooooo-----

पोलीस आयुक्त, ठाणे शहर या घटकाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची ६५४ रिक्त पदे भरण्याकरिता पोलीस शिपाई भरती २०२४-२५ प्रक्रिया राबविण्यात आली होती. कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनुसार पोलीस शिपाई यांची अंतिम तात्पुरती निवड यादी/अंतिम तात्पुरती प्रतिक्षा यादी दि.२२/०५/२०२६ रोजी जाहिर करण्यात आली आहे. तद्नंतर उमेदवारांची वैद्यकिय तपासणी, चारित्र पडताळणी व समांतर आरक्षण कागदपत्रांमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती निकषाच्या अधिन राहून व आवश्यक त्या प्रशासकिय बाबी विचारात घेवून नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी बोलाविण्यात येत आहे.

तरी वैद्यकिय व चारित्र पडताळणीत पात्र ठरलेल्या खालील नमूद उमेदवार यांनी दि.२३/०९/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजता ठाणे शहर पोलीस मुख्यालय, खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१ येथे न चुकता हजर रहावे.

पोलीस शिपाई					
अ. क्र.	चेस्ट क्र.	उमेदवाराचे नाव	मुळ प्रवर्ग	निवड प्रवर्ग	निवड समांतर आरक्षण
१	६६३०	अक्षय नवनाथ देखमुखे	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
२	१७५५७	प्रेरणा दिपक गडगे	ईडब्ल्युएस	खुला	महिला
३	१०३६७	जाफर हमीद शेख	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
४	८६६७	खयुम महमद शेख	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
५	६६४०	शेखर रुद्रप्पा होगाडे	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
६	१५७४४	रेवती अनिल पाटील	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	महिला
७	६८१३	अर्शद शकील शेख	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
८	४०७४	प्रविण बबन भोरे	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
९	१०६६८	अनिकेत श्रीकांत मगदुम	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	सर्वसाधारण
१०	१७५१६	सविता बालगोंडा बिरादार	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	महिला
११	१५९२४	सारिका शिवसिंग गिरासे	ईडब्ल्युएस	ईडब्ल्युएस	महिला

नियुक्ती आदेश स्विकारण्याकरिता बोलाविण्यात आलेल्या वरील नमुद उमेदवारांनी नियुक्तीचा अधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत याची संबंधित उमेदवाराने नोंद घ्यावी.

तसेच खाली नमूद केलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

➢ **नियुक्तीसाठी येताना खालील नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे न चुकता सोबत आणणे आवश्यक आहेत :-**

१. ०४ पासपोर्ट साईज फोटो
२. आधारकार्ड व पॅन कार्ड
३. दैनंदिन गरजेच्या वस्तू घेवून पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

Scanned with OKEN Scanner

तसेच सोबत नियमित वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वहया (२), १ पेन, १ बकेट, महिलांकरिता २ टाऊझर, २ पांढरे टी शर्ट इत्यादी आवश्यक साहित्य सोबत आणावेत. सोबत मेस ॲडव्हांस रु.२०००/- घेवून यावे तसेच संपर्कासाठी आवेदन अर्जात नमुद केलेला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अद्यावत ठेवावा. उमेदवाराने आपले सोबत मौल्यवान चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा.सोन्याचे दागिने इ.वस्तू आणू नयेत अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

➢ **विशेष सुचना:-**

१. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्या / वेळेस गैरहजर राहील्यास पुर्व सुचना न देता निवड रद्द करण्याबाबतची पुढील कारवाई करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर राहावे. सदरची पोलीस शिपाई पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन आहे. व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२. लेखी परिक्षा व मैदानी चाचणीस हजर असलेल्या उमेदवारांऐवजी इतर बोगस उमेदवार नियुक्तीसाठी हजर राहिल्यास त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

10/9/24

(मिना मकवाणा)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

मा. अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्या मान्यतेने

Scanned with OKEN Scanner